**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**

वाणिज्य विभाग, प्रकाशगड - ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग,

बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.फोन (वै)२६४४७७५३ (का)२६४७४२११, फॅक्स २६४७४३६६

---

**पी.आर-३/सबसिडी/ ३४६५५** **दिनांक : ०७.०९.२००७**

## वाणिज्य परिपत्रक क्र.६१

**विषय** :- सन २००६ -०७ या वर्षातील खरीप हंगामासाठी टंचाई परिस्थिती जाहीर झालेल्या गावांतील कृषी ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत न करण्याबाबत.

**संदर्भ** :- शासनाचे उप सचिव (ऊर्जा) महाराष्ट्र शासन यांनी संचालक (संचलन) म.रा.वि.वि.कं. मर्यादित, यांना संबांधीत केलेले शा.प.क्र. संकीर्ण २००६/प्र.क्र ९७६५/ऊर्जा ५ दिनांक २९.०८.२०००७.

संदर्भाधीन पत्राद्वारे कळविण्यात येते की, शासनाचे वर्ष २००६ -०७ या वर्षासाठी खरीप हंगामासाठी राज्यातील एकूण ४००९३ गावांत टंचाई परिस्थिती जाहिर करण्यात आली आहे. अशा गावांमध्ये अंतीम पैसेवारीची वाट न पहाता तसेच सदर तालुक्यातील सर्व गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करुन परिस्थितीतील कृषी ग्राहकांना अनुज्ञेय सर्व सवलती देण्यात याव्यात या अनुषंगाने सर्व संबंधीत क्षेत्रिय अधिका-यांना सूचना देण्यात येत आहेत की, शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार टंचाई ग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांचा विद्युत पुरवठा वीज देयकाच्या थकबाकीसाठी खंडीत करण्यात येऊ नये.

याबाबत सूचीत करण्यात येते की, सोबत सन २००६ - ०७ च्या खरीप हंगामात अंतिम पीक पैसे वारीनुसार ५० पैसे वा त्या पेक्षा कमी आलेल्या गांवांची जिल्हयानुसार संख्या दर्शविणारे विवरण पत्र जोडलेले असुन टंचाई ग्रस्त गावांची यादी त्वरीत जिल्हाधिका-यांच्या कार्यालयांकडून प्राप्त करुन घ्यावी. या संदर्भाने असे कळविण्यात येते की, सन २००६ -०७ या वर्षा करीता टंचाई परिस्थिती जाहीर झालेल्या गावांतील अल्प व अत्यल्प भुधारक शेतक-यांच्या बाबतीत (अश्वशक्तीवर आधारीत) जी ३३.३३ टक्के महसुली सुट शासनाने जाहीर केलेली आहे अशा सर्व गावांची व ग्राहकांची माहिती संबंधीत माहिती व तंत्रज्ञान विभागास देण्यात यावी जेणे करुन या सुट देण्यामुळे शासनावर पडणा-या आर्थिक बोज्याच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागास करता येईल व शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी तसा प्रस्ताव पाठविण्यात येईल.

मुख्य अभियंता (वाणिज्य)

प्रत सस्नेह रवाना :-

मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई .

आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात सन २००६-०७ या वर्षात टंचाईग्रस्त गावांतील अल्प व अत्यल्प भुधारक शेतक-यांना अश्वशक्तीवर आधारीत वीज बिलात ३३.३३ टक्के सवलत दिल्यास वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक बोज्याची परिमंडळ व ग्राहक संख्या निहाय माहिती शासनाकडून पुर्तता करण्या करीता त्वरीत पाठविण्यात यावी. तसेच शासनाकडून अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यावर सदर सूट कृषी ग्राहकांना देण्यात यावी.

C:\sachin\Marathi\Draught2006-07.doc